

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!

## मनोगते

ॐ ज्ञाप्रप्र – सुवर्ण महोत्सवानिमित्त –

सर्व विद्यार्थ्यांच्या त्यांच्या कर्तृत्वाच्या काळातील उपलब्धीचे संकलन – लेखनाद्वारे, व्याख्यानांद्वारे, मुलाखतींमधून, परिसंवादांतून – व्हावे. ते पुढील पिढ्यांना मार्गदर्शक, पुढील वाटचालीसाठी पायाभूत ठरावे.

<u>व्यक्तिगत</u>: कौटुंबिक पार्श्वभूमीवर पुढे घेतलेल्या उड्या, निर्माण केलेले मानदंड, घातलेली भर, मोठी केलेली वाट. शैक्षणिक, आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, उत्पादक, नैतिक क्षेत्रात पाळलेले स्वतःचे नियम आणि घातलेली भर.

<u>भारतीयत्व</u>: जपलेले पारंपारिक संकेत, घातलेली भर, बदललेली वाट, प्रचारात/प्रसारात आणलेली तत्त्वे, कार्यप्रणाली, संकेत, इ. समृद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास, प्रचार, व्यावहारिक उपयोग, निष्ठेने पाळलेला आचार.

<u>आर्थिक</u>: मिळविलेली/न मिळविलेली समृद्धी, त्याचा इतरांसाठी, केलेला उपयोग, नाहीरे (have nots) गटासाठी केलेला वापर, देशप्रश्न सोडविण्यासाठी केलेला वापर, स्वतःहून पाळलेले नीतिनियम, मिळविलेले/मिळवायचे समाधान.

<u>प्रश्नांची उकल</u>: विविध क्षेत्रांतील गतिरोध संपविणे, नवीन प्रश्न निर्माण न होऊ देणे, जुन्या प्रश्नांवर उत्तर शोधणे, त्यासाठीची धडपड/उपलब्धी/यश/मानदंड/मानसन्मान/अपयश

संकटे अजानरी आली। थांबवू न अम्हा शकली।
ती अखेर सारी थकली। नमविला तयांनी माथा॥
जगतास देऊ मानवता। .... याचे अनुभव

अ.ना.आंभोकर

## ५१@५१ च्या गोष्टींच्या निमित्ताने

गेले वर्षभर म्हणजे २०२१ मध्ये दर रविवारी एक, अशा ५१ गोष्टींचे सादरीकरण आम्ही करत होतो. 'आम्ही' म्हणत असताना हे एक वेगळे गटकार्यच होते. प्रशालेतून उत्तीर्ण होऊन महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या २० ते २५ वयोगटातील युवक-युवतींपासून ६० वयोगटापुढील कार्यकर्ते, सदस्य यांचा सहभाग असलेले हे गटकार्य सुरुवातीस तर काही महिने (करोनाच्या उद्रेकामुळे) आभासी पद्धतीनेच होत होते. नंतरच्या काही महिन्यांत प्रत्यक्ष भेटी सुरू झाल्या. वर्षभरात प्रशालेच्या पहिल्या दशकातील (युवक प्रशाला १९७६ ते १९८४) प्रातिनिधक स्वरुपात पन्नासहून अधिक व्यक्तींचा परिचय, त्यांच्या अनुभवांचे संकलन आपणापर्यंत पोहोचवू शकलो याचा आम्हा सर्वांना आनंद व समाधान आहे,


५१@५१ मधील प्रत्येकच गोष्ट विशेष आहे कारण त्या त्या व्यक्तीने अत्यंत मोकळेपणे स्वतःच्या प्रबोधिनीतील शिक्षणानंतरच्या प्रवासाबद्दलचे अनुभव सर्वांसमोर प्रथमच एकत्र व्यक्त केले आहेत. आम्हांलाही व अनेक वाचकांनाही त्यांचे प्रवासातील अनेक पैलू अपरिचित होते. प्रशालेतील शिक्षणातील आठवणींमध्ये 'रमणाऱ्या' आठवणी (nostalgia) होताच पण क्वचित प्रसंगी ते लेखन कमी करून, पुढच्या प्रवासातील वाटचालींवर भर द्यावा, अशी आमची सूचना अनेकांनी उचलून धरली. त्यामुळे एकीकडे 'मागे वळून पाहताना' looking backwards आणि आयुष्यातील या टप्प्यावर पुढे पाहताना looking forward असा भूत-वर्तमान-भविष्य यांना जोडणारा आपल्याच सहकारी युवक-युवतींचा प्रवास अनुभवणे, हा आमच्यासाठी विलक्षण अनुभव होता. सर्वच सहभागी प्रशालेय युवक-युवतींना गटातर्फे मनःपूर्वक धन्यवाद देतो.

आज समाजामध्ये अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये असे माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी संघ कार्यरत दिसतात. अगदी शालेय गटांपासून ते IIT, IIM, महाविद्यालयातही हे गट असतात. नव्या समाज माध्यमांमुळे असे गट जुळणेही जरा सुलभ झाले आहे. प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थी संघाची Alumni Foundation ची स्थापनाही दोन वर्षांपूर्वीच सुरू झाली. आपल्या मातृसंस्थेतून मिळालेली मूल्यांची शिदोरी घेऊन आपण कोठपर्यंत पोचलो, हे एका अर्थाने व्यापक समाजाला केलेले हे प्रकट निवेदनच आहे. ५१@५१ मध्ये मूल्यमापन, संशोधन किंवा अभ्यास प्रकल्पाची कोणतीही आखणी नव्हती. एकमेकांना प्रवासाबद्दल सांगावे व त्यातून हरवलेले, विस्कळीत झालेले किंवा नव्याने बंध जुळवून यावेत, इतकाच हेतू होता. तो किती प्रमाणात साध्य झाला आहे, हे वाचकांनीच ठरवायचे आहे.

५१च्या यादीत आणखी निदान ७५ नावे वाढविता आली असती. पहिल्या दशकात आणखी ५-१० वर्षांनंतरच्या तुकड्यांची भर पडली असती तर कदाचित २००@५१ अशीही मालिका झाली असती. त्यामुळे कदाचित ज्यांची नावे या मालिकेत घेऊ शकलो नाही, त्यांनी या मर्यादेमुळे आमची असमर्थतता समजून घ्यावी, ही विनंती. कदाचित नव्या दमाच्या, नवीन गटाला वेगळ्या format मध्येही असे अनुभवकथन चालू ठेवता येऊ शकेल! सर्व सहभागी युवक-युवतींना, आमच्या गटातील स्वयंसेवी वृत्तीने या गटकार्यात सहभागी झालेल्या सदस्यांना व या लेखमालेच्या सर्व वाचकांना पुनश्च धन्यवाद देतो. तूर्त पूर्णविराम!

आपले,

डॉ. अजित कानिटकर (१९७६) डॉ. विवेक कुलकर्णी (१९७३) डॉ. मिलिंद नाईक (१९८९)



**श्रेयश फापाळे**

**इ. १०वी – २०१६**

**गेली सहा वर्षे ज्ञान प्रबोधिनी युवक विभागात क्रांतिवीर चाफेकर दलावर कार्यरत आहे. या वर्षीपासून प्रशालेत अंशकालीन अध्यापक म्हणून वक्तृत्व अभिव्यक्तीचे अध्यापन करतो तसेच सध्या मराठवाडा मित्रमंडळ अभियांत्रिकी महाविद्यालयात मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या चतुर्थ वर्षाचे शिक्षण सुरू आहे.**

**9028009154**

**shreyash.phapale@jnanaprabodhini.org**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रशालेचे प्राचार्य मिलिंद सरांचा फोन आला आणि त्यांनी भेटायला बोलावले. आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या कार्याची माहिती सर्वांना होईल असे लिखाण आपण प्रशालेच्या ब्लॉगवर आणि वेबसाइटवर टाकुयात अशी कल्पना होती. पहिल्याच संवादात मी हो म्हटलं पण लवकरच हे काम तितकं सोप्पं नाही हे जाणवलं. सुवर्ण महोत्सव मेळावा झाला त्या दिवशी सरांनी पुन्हा आठवण करून दिली की आता वेगात काम सुरू करायला हवे. त्यावेळी माझा वर्गमित्र अथर्व पाटणे आणि मी मार्चमध्ये पहिल्या व्यक्तींशी संपर्क केला. अशा तीन-चार युवक-युवतींच्या मुलाखती झाल्या. तरी माजी विद्यार्थ्यांची नावे ठरवणे, त्यांचा संपर्क मिळवणे, वेळ ठरवणे, प्रत्यक्ष मुलाखत आणि मग त्याचे शब्दांकन, त्यातील दुरुस्त्या असे सर्वच काम प्रचंड वेळखाऊ आणि कष्टाचे होते. पहिल्या सहा महिन्यात आम्ही फक्त तीन-चार मुलाखती घेतल्या आणि त्यातच लॉकडाऊन सुरू झाले. हा उपक्रम पुढे ढकलावा की बंद करावा असा विचार डोकावू लागला आणि पुढे काही विशेष घडेना.

प्रशालेचा ५१व्या वर्षातील ऑनलाइन माजी विद्यार्थी मेळाव्यात आदरणीय संचालकांनी प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांच्या कामाचा धावता आढावा मांडून असे संकलन व्हावे असे म्हटले. जादूची कांडी फिरून बंद पडेल की काय अशी वाटणारी गाडी शर्यतीत धावू लागल्याप्रमाणे एके दिवशी अजितरावांचा फोन आला आणि सर्व गोष्टी जुळून यायला लागल्या. पुढच्याच आठवड्यात एकाच दिवशी आम्ही सकाळी-दुपारी-संध्याकाळी अशा तीन मुलाखती घेतल्या. याच काळात alumni portal वर मला आदरणीय वामनराव अभ्यांकरांचे सुवर्ण महोत्सव मेळाव्याच्या निमित्ताने बैठकीत तयार केलेलं टिपण वाचायला मिळालं आणि त्यामध्ये प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी प्रबोधिनीतून सोबत नेलेली संस्कारांची 'शिदोरी' आणि त्यांच्या आयुष्यातील उपलब्धीचा आणि कार्यकर्तृत्वाचा 'मागोवा' घेऊन संकलन व्हावे असे नमूद केलेले होते. त्यादरम्यान आम्ही आत्तापर्यंत केलेल्या कामाचे पहिले निवेदन अथर्व आणि मी अजितराव, मिलिंद सर, विवेक सर आणि सुजलाताई यांच्या समोर सादर केले आणि या सर्व कामाला या बैठकीतून एका उपक्रमाचे स्वरूप मिळाले. या दोन गोष्टींमधून मला वैयक्तिकरित्या आपल्याला नक्की काय काम करायचे आहे? का करायचे आहे? आणि कसे करायचे आहे या प्रश्नांची उत्तरे मिळाली. पहिल्या दशकातील माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊयात आणि त्यासाठी युवक गटासाठी एक छोटा गट, युवती गटासाठी एक छोटा गट आणि सर्व संपादन-आरेखनासाठी एक छोटा गट असे सर्वांनी मिळून एक मोठे गटकार्य करायचे ठरले. एव्हाना प्रशालेचे ५१ वे वर्ष सुरू झालेले होते आणि त्यामुळे दर रविवारी एक गोष्ट याप्रमाणे ५१ गोष्टी प्रसिद्ध करूयात असे निश्चित झाले आणि ५१@५१ या उपक्रमाचा नव्याने जन्म झाला!

कुरुक्षेत्रातील भगवान कृष्णाने सांगितलेली गीता धृतराष्ट्र संजयाकडून ऐकतो त्याप्रमाणेच या मुलाखतींच्या श्रवणामधून आम्हाला आप्पा भेटले, आण्णा (व. सी. ताम्हणकर), भाऊ (वामनराव अभ्यंकर) भेटले, भाई (विवेकानंद फडके) भेटले आणि ते जणू आमच्याशी प्रत्यक्ष संवाद साधू लागले. 'रूप पालटू देशाचे', 'प्रबोधिनीला २०० समर्पित कार्यकर्ते देशाला द्यायचे आहेत', 'तुम्ही लढवय्ये आहात, मोठी आव्हाने स्विकारा, परिस्थितीवर मात करून विजयी व्हा!', 'उत्तमतेचा ध्यास घ्या', 'रजोगुणी व्हा, कर्मयोगी व्हा, पराक्रमी व्हा', 'निवडाल त्या कार्यक्षेत्रात नेतृत्व करा आणि देशाला त्या क्षेत्रात अग्रणी बनवण्याचा ध्यास घ्या' अशी आवाहने आप्पा प्रत्यक्ष जणू आम्हालाच करत होते. आज युवक विभागात काम करत असताना ज्यांच्याकडे पाहत आपण असे बनलो पाहिजे असे वाटते असे आ. संचालक गिरीशराव, सुभाषराव, यशवंतराव, विसूभाऊ

रामभाऊ, विनयराव, शरदराव, मोहनराव, अशोकराव, विवेक सर, अजितराव, महेंद्रभाई, लताताई, नलूताई, विद्याताई अशी सर्व उत्तुंग मंडळी प्रबोधिनीत कसे घडत होते आणि नवीन प्रबोधकांना कसे घडवत होते याचा आम्हाला देखील अनुभव मिळू लागला. 'प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया' याचा प्रत्यय येऊ लागला तसेच 'समर्थ मायभूमीला जगी करावया' या ओळींचा अर्थ या कार्यकर्त्यांच्या आणि आपल्या प्रबोधक माजी विद्यार्थ्यांच्या कर्तुत्वातून जाणवू लागला.

उपक्रमाच्या निमित्ताने शिमला, दिल्ली, गोवा अशा ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन मुलाखती घ्यायला मिळाल्या. दूरस्थ पद्धतीने भारतातील विविध राज्य आणि भारताबाहेरील तीन खंडातील माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्या. उपक्रमाला वेळोवेळी मिळणारे प्रतिसाद मनोबल वाढवणारे होते. निशिगंधाताईने बनवलेला उपक्रमाचा लोगो आणि आरेखन आकर्षक होते. हे करत असताना मुलाखत कौशल्य तर शिकायला मिळालेच पण सोबत संवाद कौशल्य, नियोजन कौशल्य, सहविचार, नेतृत्व अशा अनेक गोष्टी आम्ही अजितराव, तारकाताई, मानसीताई, विवेक सर आणि मिलिंद सर यांच्याकडे पाहत नकळत शिकत आलो. आयत्यावेळी होणारी प्रचंड धावपळ, करावी लागणारी जुळवाजुळव, उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यांचा कल्पक परिहार अशा अनेक गोष्टी या गटात अनुभवायला मिळाल्या. रविवारी येणाऱ्या गोष्टीचे शब्दांकन आधीच्या सोमवारी संपादन गटाला देणे हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या वेळाच शक्य झाले. त्यामुळे मानसीताई आणि पल्लवीताईंनी अनेकदा शनिवारी रात्रीपर्यंत कार्यालयात काम केले, अजितराव आणि तारकाताईंनी संपर्कापासून ते थेट कधी आम्हाला प्रत्यक्ष लेखनासाठी देखील मदत केली. असे अनुभवी सदस्यांचे प्रत्यक्ष कष्ट पाहिल्यानंतर 'जादूची कांडी' आपोआप फिरत नसते तर त्यामागे पडद्यामागे कुठलीही तक्रार न करता काम करत राहणारे कार्यकर्ते असतात ही जाणीव झाली.

उपक्रमाच्या सुरुवातीच्या काळात आ. संचालकांनी प्रश्न विचारलेला की, 'शेवटपर्यंत हाच उत्साह टिकून राहील ना?' त्यावेळी सहज 'नक्कीच राहील' असे उत्तर देताना 'का राहू शकणार नाही?' असा प्रश्न मनात आला होता. मात्र प्रत्यक्ष काम करताना शेवटी-शेवटी असा उत्साह संपू न देणे हे खरंच आव्हानात्मक होते. अशावेळी अजितरावांशी एखादा फोन, मिलिंद सरांशी धावता संवाद किंवा संचालकांचा एखादा शब्द देखील सहज प्रेरणा जागृत करायला आणि टिकवून ठेवायला मदत करायचा. दीर्घकाळ एका गटात एक उपक्रम सुरू ठेवण्यासाठी गटाची आणि गटातल्या प्रत्येक सदस्याची लागणारी प्रेरणा आणि त्याचे संक्रमण, चिकाटी, जिद्द आणि त्यातही उत्तमता ठेवून, सर्वांच्या मताने भांडत-चर्चा करत सहविचार करून उपक्रमाला पुढे नेत राहणे हे नक्कीच प्रत्येक कार्यकर्त्याने अनुभवण्यासारखे आहे असे मला वाटते. संपर्क - संवाद - संघटन अशा त्रिसूत्रीचा अनुभव या उपक्रमातून घेता आला. ५१@५१ मध्ये प्रबोधिनीचा शिक्षणविचार, प्रबोधिनीला अभिप्रेत असे कार्य आणि आजच्या काळातील प्रबोधिनीचे काम हे समजून घेत असताना एक कार्यकर्ता म्हणून मी प्रबोधिनीच्या अधिक जवळ आलो. हा उपक्रम औपचारिकरित्या संपला असला तरी आप्पांच्या स्वप्नातील प्रबोधिनीच्या कार्याच्या 'नीजध्येयाची वाट नाही संपली' हे निश्चित!



**अथर्व पाटणे**

**इ. १०वी – २०१६**

**ज्ञान प्रबोधिनी युवक विभागात डॉ. विक्रम साराभाई (युवक विज्ञान दल) दलावर कार्यरत आहे.**

**सध्या एमआयटीमध्ये केमिकल इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण सुरू आहे.**

**9075016022**

**atharva.patne@jnanaprabodhini.org**

मिलिंद सरांनी श्रेयशला विचारले की अशी एखादी मालिका सुरू करण्याचा विचार सध्या चालू आहे तर तुला त्यात सहभागी व्हायला आवडेल का. त्याने लगेच हो म्हणून अथर्वसुद्धा माझ्यासोबत काम करेल असे तेव्हा सांगून पण टाकले. हे करावे की नाही असा माझा काही निर्णय झाला नव्हता, किती वेळ द्यावा लागेल आणि मी किती वेळ काढू शकेन असे फार काही स्पष्ट नव्हते. पण दिलेल्या वेळात माझ्या विचारांच्या कक्षा रूंदवल्या आणि बरेच काही नवीन शिकायला मिळाले. मोठ-मोठे पराक्रम केलेल्या लोकांना भेटायचं आणि त्यांच्या गोष्टी ऐकायच्या हे कोणाला का नाही आवडणार!

या आधी कधी अशा मुलाखती घेणे वगैरे केले नव्हते. मुलाखत कशी घेतात हे माहीत नव्हते. झालेल्या मुलाखतींचे शब्दांकन कसे करतात, ideal शब्दांकन कसे असावे या कशाचाच गंध नव्हता. पण अजितरावांनी या कशाचेच दडपण येऊ दिले नाही. सगळेच काही जन्मजात विद्वान नसतात, हळू-हळू तुम्ही पण शिकाल, आत्ता जसे जमते आहे तसे चालू ठेवा असे ते सारखे सांगत असत. त्यामुळे बाकी काही येत नसलं तरी हे ऐकून आत्मविश्वास मात्र नक्की यायचा! या सगळ्या ५१ मुलाखती झाल्यानंतर मला काही गोष्टी कळून चुकल्या, काही सूत्र मिळत आहेत का असे मी शोधत होतो. ते खालील प्रमाणे:

प्रत्येक व्यक्तीची एक स्वतःची स्वतंत्र philosophy (किंवा स्वधर्म) असते किंवा असावी लागते. आणि ती original म्हणजे स्वयं प्रेरणेतून निर्माण झालेली पाहिजे. दुसऱ्यांची philosophy आपण कॉपी नाही मारू शकत आणि कॉपी केलीच तरी पुढे तिचा आधार घेत भव्य पराक्रम करता येत नाहीत. आपल्या कर्तृत्वासाठी आणि पराक्रमासाठी आपली स्वतःला पटलेली आणि महत्त्वाची वाटणारी philosophy असली पाहिजे. ही philosophy बऱ्याचदा आपोआप व्यक्तिमध्ये विकसित होत जाते. पण डोळसपणे सुद्धा त्याचा विकास करता येऊ शकतो आणि करावा. डोळसपणे अंगी बाणवलेली आपली स्वतः ची philosophy वापरणे, जगणे म्हणजेच सर्वश्रेष्ठ कर्मयोग. जसे-जसे आपल्याला नवनवीन धडे मिळत जातात तशी-तशी आपली philosophy सुद्धा आपण update करत राहिली पाहिजे. Learn, Un-learn आणि Re-learn या सतत करत राहण्याच्या गोष्टी आहेत.

जग इकडचं तिकडे झालं तरी आपल्या कामातले सातत्य गेले नाही पाहिजे. अतिशय शिस्तीने काही गोष्टी पाळल्याशिवाय पराक्रम घडत नाहीत. व्यक्तिमत्त्वाला stature येत नाही. Discipline is paramount. Always. मोठे चित्र रेखाटत असताना प्रत्येक स्ट्रोक महत्त्वाचा असतो. त्याशिवाय masterpiece तयारच होऊ शकत नाही. आपण घेतलेले सगळे निर्णय लवकरात लवकर स्वतः हून own up करायला शिकले पाहिजेत. आणि निर्णय न घेणे हा पण एक निर्णयच असतो हे ही लक्षात ठेवले पाहिजे. परंतु नंतर पुढे कधी वाईट अनुभव आला म्हणून घेतलेल्या निर्णयाबद्दल कधीही खेद, regret वाटून घेऊ नये.

Moneyball चित्रपटात Billy Beane (टीम मॅनेजर) आणि Peter Brand( इकॉनॉमिक्स शिकलेला तरुण) हे दोघे २००२ मध्ये baseball च्या लीगमध्ये इकॉनॉमिक्सची सूत्रे वापरून baseball चा चेहरामोहराच पूर्ण बदलून टाकतात. अगदी तशाच आपापल्या क्षेत्रात अर्थपूर्ण, परिणामकारक, नावीन्यपूर्ण आणि भक्कम पाया रचणाऱ्या आणि तेवढीच शिखरे सर करणाऱ्या आपल्या प्रबोधिनीतल्या अशा अनेक Billys आणि Peters शी माझा प्रत्यक्ष संवाद होऊ शकेल असे या आधी मला कधी वाटले नव्हते. मला हे सगळे अनुभवता आले, मनमोकळ्या गप्पा मारता आल्या, हे खरे माझे भाग्यच आहे. या ५१ जणांकडून वर्षभर, आठवड्यागणिक प्रेरणा मिळत राहिली. या सर्वांनी करिअर संबंधी किंवा एकूणातच मोठे निर्णय कसे घेतले ते पाहून, ते बघून आणि त्यावर विचार करून माझे स्वतःचे निर्णय घेताना इथून पुढे मला नक्की या सर्व life stories ची नक्कीच मदत होणार आहे.

वर्षभर या उपक्रमात भरपूर मजा केली. दोन-तीन वेळा ठेच पण लागली. But it was worth it. Conclusively, I got to know what to focus on in life as a whole what really matters. And I'm very very fortunate to have been a part of this series! Loved it!



**तारका कोंढरे – भालेराव**
**इ. १०वी – १९९८**
**युवती विभागात काम केले आहे. माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी काम केले आहे.**
**शिक्षण – बीएस्सी – फिजिक्स**
**१० वर्षे ई–लर्निंग कंपनीमध्ये कामाचा अनुभव**
**सध्या प्राणिक हिलर म्हणून काम करते.**
**9822343638**
**taraka.kondhare@gmail.com**

माजी विद्यार्थी २०१९ च्या भव्य मेळाव्या निमित्त अनेक माजी विद्यार्थी – विद्यार्थिनी पुन्हा एकदा प्रबोधिनीशी जोडले गेले. हा संपर्क असाच वाढत रहावा आणि याचा उपयोग सर्वांना व्हावा यासाठी अनेक गट, उपक्रम सुरू झाले. त्यामधलाच ५१@५१ हा उपक्रम. साधारण दिड वर्षापूर्वी अजितरावांनी जेव्हा पुन्हा एकदा माजी विद्यार्थिनींशी संपर्क करूयात आणि मुलाखती घेऊयात असे सुचवले तेव्हा मला हे करायला नक्की आवडेल असे वाटले. ५१ वर्षानिमित्त पहिल्या दशकातील ५१ माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊयात असे ठरले. २५ युवतींची नावे ठरवणे आणि मुलाखतीसाठी पहिला संपर्क करणे, मुलाखत घेणाऱ्या युवती गटाला मार्गदर्शन करणे आणि मुलाखत फेसबुक, व्हॉट्स ॲप आदी माध्यमातून भारतात आणि भारताबाहेरील प्रबोधिनीच्या विविध गटांपर्यंत पोचवणे अशी बरीच कामे होती. अर्थातच या सगळ्यासाठी लागणारा मोठा गट ही हवा होता. चिन्मयी, ईशा, अपूर्वा, मुक्ता, निशिगंधा, श्रेयश, अथर्व असा छान गट जमला. मुलाखत घेणारा गट शेवटपर्यंत उत्साहाने काम करत होता. मुलाखत झाली की लेखनाचे काम मोठे होते तेही काम अतिशय नेटाने केले. त्या नंतर संपादन करून त्या गोष्टी पूर्ण करणे हे काम मानसीताई आणि पल्लवीताईंनी अतिशय चिकाटीने केले. अनेकदा उशिरापर्यंत, अगदी सुट्टीच्या दिवशी त्यांना काम करावे लागले. सर्वच काम virtually चालू होते आणि सर्वांसाठी हा नवीन, खूप काही शिकवणारा अनुभव होता. अनेक जणींना पहिला संपर्क झाला तेव्हा आम्ही खूप काही मोठे काम नाही केले असे त्यांना वाटतं होते. पण मुलाखत घेतल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समोर येत होते.

प्रबोधिनी मधून बाहेर पडल्या नंतर अनुभवाचे क्षेत्र विस्तारले. अनेक गोष्टी नव्याने शिकाव्या लागल्या. प्रबोधिनीत आपण अनेकदा उत्तमतेचा, नाविन्याचा, creatively गोष्टी करण्याचे बोलत असतो. हे सर्व या युवती त्यांच्या क्षेत्रात प्रत्यक्ष करतानाचे अनेक अनुभव आम्हाला ऐकायला मिळाले. कला, बँकिंग, आरोग्य, संशोधन, सामाजिक, शिक्षण असो किंवा एखादी IT company मधील नोकरी असो, एखादा उघोग चालवणे असो या सर्वच ठिकाणी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. आपले घर आणि काम या दोन्ही गोष्टी छान सांभाळताना दिसतात. सतत नवीन काही शिकण्याची वृत्तीही खूप विशेष वाटते.

या उपक्रमामुळे पुन्हा एकदा अनेक जणीशी connect होता आले आणि अनेक लोकांपर्यंत या गोष्टी पोचवता आल्या याचा आनंद आहे.



**चिन्मयी खरे**

**इ. १०वी – २०१६**

**माजी विद्यार्थ्यांच्या या गटात अगदीच नवखी आणि लहान!**

**सध्या मी पुण्यातील आयएलएस विधी महाविद्यालयामध्ये दुसऱ्या वर्षात शिकते, थोडी संस्कृतची आवड आहे म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत विशारद करते आणि माझा छंद नृत्य असल्याने त्यात विशारद करते आहे!**

**8669127040**

**10chinmayeekhare@gmail.com**

आज मुलाखत आहे, त्यांना संपर्क करायचाय, काही प्रश्न जरा बदलायला हवेत, मानसीताई परीक्षा आहेत, सोमवारी देऊ शब्दांकन?, त्यांनी बरेच बदल सांगितले आहेत, कालची मुलाखत खूप मोठी झाली आहे! , zoom meeting on कर ना!

या आणि अशा असंख्य प्रश्नांमध्ये आम्ही सगळेजण गेले वर्षभर झगडत होतो. एक वर्षभर या प्रकल्पाच्या निमित्ताने नवीन माणसांना भेटायची, बोलायची संधी मिळत गेली. माझं काम खरंतर एकीकडून विचार घ्यायचे आणि दुसरीकडे पोचवायचे एवढंच होतं पण या खेळात मधल्या कावळ्यालाही इतकं शिकायला मिळतं हे मात्र नवीन होतं.

प्रत्येक नव्या माजी विद्यार्थ्यांना भेटल्यावर काहीतरी नवं जाणवायचं, काहीतरी आपल्यासारखं आहे असं वाटायचं, कधी आपल्याला इथे जायचं आहे असं वाटायचं.

जवळपास ५१ माणसांची ३० वर्षं आम्ही गेल्या वर्षभरात अनुभवली, त्यांचे थरार, यश–अपयश हे सगळ्यांनी एका चित्रपटासारखं आमच्यासमोर उलगडून दाखवलं. काही वेळा मी स्वतः मुलाखतकार आहे हेच विसरून जाऊन मुग्ध होऊन ऐकतच असायचे. मुलाखत घेतल्यानंतर ती लिहिताना त्या सगळ्या विचारांची उजळणी व्हायची, नवं करायला सुचायचं, नवी प्रेरणा मिळायची. मला या सगळ्या प्रवासाने खूप समृद्ध केलं. अनेक निरुत्तरित, कधी न विचारलेल्या वैयक्तिक प्रश्नांची उत्तरं मिळत गेली आणि बुद्धीला वैचारिक खाद्य मिळत गेलं.

हा ५१ वर्षांचा प्रबोधिनीचा प्रवास ५१ नजरांमधून मांडत असताना, प्रबोधिनीचीच नव्याने ओळख झाली. आमच्या पिढीने न पाहिलेल्या प्रबोधिनीची ओळख झाली. आप्पांना मी कधीच पाहिलं नसलं तरी असंख्य प्रसंगांच्या लिखाणातून एक पुसटशी का होईना पण उत्तम संघटक असलेल्या आप्पांची प्रतिमा माझ्याकडे तयार झाली. एक–एक अनुभवातून प्रबोधिनीची व्यापक पण सहज अशी संकल्पना पाहता आली.

शब्दातून माणूस उभा करण्याचा हा एक प्रयत्न होता, मुलाखतीच्या इतक्या जवळ असूनही आपला गंध त्यात न मिसळू देण्याचा हा प्रयत्न होता. आणि स्वतःला आणि सर्व वाचकांना नव्या विचारांनी समृद्ध करण्याचा हा एक प्रयत्न होता असं मला वाटतं.



**ईशा कान्हेरे,**

**इ. १०वी – २०१०**

**मी मानसशास्त्रात masters केले आहे, गेल्या सात महिन्यांपासून प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेत शैक्षणिक उपविभागात समन्वयक आणि मानसतज्ज्ञ म्हणून काम करते. प्रज्ञा मानस संशोधिकेद्वारे प्रज्ञावंतांचे शिक्षण (Education of Gifted- Methods and Strategies) हा पुणे विद्यापीठाशी सलग्न पदाविपूर्ण अभ्यासक्रम चालतो त्याचं मी मुख्यत्वे काम बघते आणि अध्यापन करते. मी स्वतः सुद्धा हा अभ्यासक्रम २०१९ साली पूर्ण केला.**

**9764988461**

**isha.kanhere@jnanaprabodhini.org**

वर्ष-दीड वर्षापूर्वी जेव्हा ५१@५१ या उपक्रमाबद्दल कळले तेव्हा नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. मुलाखत घेण्याचा फार अनुभव हाताशी नव्हता पण प्रबोधिनीच्या च शिकवणी नुसार करून बघू असं ठरवलं. जास्त वेळ देणं शक्य नसल्याने फक्त मुलाखती घेण्यासाठी, संपर्क करण्यासाठीच होकार दिला.

सर्वच मुलाखती घेताना प्रबोधिनी हा एक common connection point आहे असे जाणवत होते. परंतु प्रत्येक मुलाखती मधून विविधतेच्या छटासुद्धा दिसत होत्या. कोणाला शाळा म्हणल्यावर एखादे शिक्षक आठवत होते तर कोणाला कुठला दौरा किंवा दल किंवा अजून काही. पण हे सर्व एकाच शाळेकडून मिळत होतं हे महत्त्वाचे वाटले. शाळेत येणाऱ्या प्रत्येकाच्या बहुविध प्रज्ञेला खाद्य पुरेल असे अनेक उपक्रम प्रबोधिनीत गेले ५१ वर्षं होत आलेत, काही यशस्वी काही कदाचित अयशस्वी. या सर्वच तायांशी गप्पा मारतना मी स्वतः किती श्रीमंत अशा वातावरणात सहा वर्षं शिकले याची परत आठवण झाली आणि त्या निमित्ताने कृतज्ञतेची भावना निर्माण झाली.

या युवतींशी बोलताना, त्यांचे अनुभव ऐकताना मी प्रज्ञावंतांचे शिक्षण या विषयाशी निगडित जे वाचन केले आहे, जो अभ्यास करायचा प्रयत्न करते आहे त्यातील बऱ्याच गोष्टी या relate होतात. साधारणपणे natural abilities to developed gifts (/talents) असा व्यक्तीचा प्रवास असतो; ५१@५१ च्या मुलाखती घेताना, वाचताना शाळा, कुटुंब, मित्र परिवार, उच्च शिक्षण, समाज या सर्वच गोष्टी या प्रवासातील महत्त्वपूर्ण अनुभव देत असतात हे लक्षात आले.

या मुलखात घेण्याच्या प्रक्रियेत आम्हाला एक गट म्हणून पण मजा आली.



**अपूर्वा इनामदार**
**इ. १०वी – २०१०**
**इन्फरमेशन टेक्नॉलॉजीमध्ये इंजिनिअरिंग केले**
**सध्या ॲमडॉक्स DVCI मध्ये सीनिअर परफॉर्मनन्स टेस्ट इंजिनिअर म्हणून काम करते.**
**9552535812**
**apoorvaajitinamdar@gmail.com**

५१@५१ ह्या उपक्रमामध्ये मी थोडी उशिराने सहभागी झाले. गेले दोन वर्षं माजी विद्यार्थी मंडळासाठी इतर काही उपक्रमांमध्ये भाग घेतला होता, त्याच सुमारास या उपक्रमाबद्दल देखील कळले. माझा स्वभाव गप्पिष्ट असल्याने आणि लेखनाची थोडी फार आवड असल्याने हा प्रयोग आकर्षक वाटला. गेल्या काही वर्षांत मला प्रबोधिनीची जादू अगदी जवळून बघता आली आहे. कुठलाही माजी विद्यार्थी/विद्यार्थिनी घ्या, तुम्ही त्या व्यक्तीशी कधीच बोलला नसाल, ती व्यक्ती तुमच्यापेक्षा खूप मोठी असेल अथवा खूप लहान असेल, केवळ प्रबोधिनी हा शब्द उच्चारला की तिळा-तिळा दार उघड म्हणल्यावर जसं अलिबाबाच्या गोष्टीतल्या गुहेचं दार उघडायचं, अगदी तश्शीच त्या व्यक्तीच्या मनाची दारं उघडतात. त्यातल्या बऱ्याच जणींना कधीच भेटले नव्हते, परंतु एकाच भेटीत असं वाटलं जणू खूप वर्षांपूर्वीच्या मैत्रिणी आज गप्पागोष्टी करत आहोत.

या मुलाखतींच्या निमित्ताने विविध कार्यक्षेत्रांची आणि व्यक्तींची ओळख झाली. प्रबोधिनीत असताना बुद्धिमत्तेचे पैलू या विषयावर आम्ही बऱ्याचदा चर्चा करायचो. मुलाखती घेताना त्याचा प्रत्यय आला. विविध स्वभावाच्या, विविध कार्यक्षेत्रातल्या, विविध व्यक्तिमत्त्वाच्या या सर्व विद्यार्थिनी आजही प्रबोधिनीच्या नाळेशी जोडलेल्या आहेत. प्रकर्षाने जाणवलेली अजून एक बाब अशी – या सर्व माजी विद्यार्थिनींच्या निर्णय प्रक्रियेमध्ये कुठे ना कुठे प्रबोधिनी डोकावते. हे निर्णय वैयक्तिक, कार्यक्षेत्रातील, सामाजिक अथवा इतर कुठल्याही बाबतीतले असतील, प्रबोधिनीची शिकवण त्याचा महत्त्वपूर्ण हिस्सा आहे.

ज्यांची मुलाखत घेण्याचा योग आला, त्या सर्व माजी विद्यार्थिनी साधारण पन्नाशीच्या आसपास आहेत. त्यांना ३० पेक्षा जास्ती वर्षांचा कामाचा अनुभव आहे. माझ्यासारख्या आत्ताच करिअरला सुरुवात केलेल्या व्यक्तीसाठी त्यांचे अनुभव खूपच महत्त्वाचे आहेत. या माजी विद्यार्थिनी एका अशा पिढीचा भाग आहेत, who were a crucial part of expanding work opportunities across many fields and geographies. आज माझ्या पिढीच्या मुलींसाठी अनेक कार्यक्षेत्रातील दारे उघडी आहेत, परंतु ती दारे उघडण्याचा संघर्ष या माजी विद्यार्थिनींच्या पिढीचा आहे, असं मला मुलाखत घेताना वाटलं. आजही त्या आपापल्या क्षेत्रात अनेक अर्थांनी pathbreakers आहेत, एवढंच नाही तर वेगळ्या वाटेने जाणं त्यांनी सहजरित्या normalize केलं आहे.

मुलाखतीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मला आपल्या एका पद्याच्या काही ओळी नव्याने अनुभवता आल्या – इतिहासाची उलटून पाने, भविष्यवेधी कृती हवी। अभ्युदयाला परमार्थाच्या उपासनेची जोड हवी।। या निमित्ताने एका उत्तम गटकार्याचा भाग झाल्याचा आनंद आहे. मला ५१@५१ च्या गटाकडून तसेच उपक्रमात सहभागी सर्व माजी विद्यार्थ्यांकडून भरपूर शिकता आलं, अजूनही शिकतेय आणि शिकत राहीन..



**निशिगंधा खळदकर.**
**इ. १०वी – २०१०**
**शाळेतून बाहेर पडल्यावर २०१५ पर्यंत युवती विभागात काम करत होते.**
**बीए – इकॉनॉमिक्स**
**Master's of Design (Apparel & Textile), NID, Ahmedabad**
**सध्या फॅशन, ग्राफीक्स आणि सस्टेनेबल डिझाइनिंगमध्ये स्वत:ची कामे करते**
**7798825807**
**nishik094@gmail.com**

शाळेतून बाहेर पडल्यावर २०१५ पर्यंत युवती विभागात काम करत असल्याने प्रबोधिनीच्या उपक्रमांमध्ये आणि दैनंदिन कामांमध्ये माझा कायमच सहभाग असायचा. पण नंतर उच्च शिक्षणासाठी पुण्याबाहेर गेल्यामुळे उपक्रमांमधील प्रत्यक्ष सहभाग कमी झाला.

जेव्हा ५१@५१ च्या निमीत्ताने अजितरावांशी बोलले तेव्हा आधी सारखच प्रबोधिनीसाठी काम करायची संधी मिळणार या विचाराने त्यांना लगेच हो म्हणाले! याचं कामसुद्धा अगदी मी ज्या क्षेत्रात काम करते त्याच्याशी मिळतं जुळतं. त्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला! ५१@५१ च्या टीममधली विविधता आणि मुलाखत देणाऱ्या व्यक्तींमधली विविधता कळल्यावर देखील खूप भारी वाटलं!

अजितराव आणि वि. कु. सरांबरोबर काम करायची पहिलीच वेळ. मानसीताई, पल्लवीताई यांच्या बरोबर पण काम पहिल्यांदाच करत होते. तारकाताई बरोबर युवती विभागात घेतलेल्या क्रीडा शिबिरा नंतर इतक्या वर्षांनी काम करायची संधी मिळाली, आणि माझ्या मैत्रीणी ईशा आणि अपूर्वा या ही असल्याने मला स्फूर्ती मिळाली. त्याच बरोबर चिन्मयी, जिचं मी दल घेतलं आहे, ती मुख्य मुलाखतकारांमध्ये होती! या गटात काम करणाऱ्यांची वयं, आवडी-निवडी आणि व्यवसाय यात विविधता इतकी मस्त होती की या गटात काम करायला खूपच मजा आली!

प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या पैलूंना लक्षात घेऊन ५१@५१ चे digital identity design करणं ही खूप आकर्षक व आव्हानात्मक प्रक्रिया होती. त्याच्यात गणवेश घातलेले पण शालेय वयीन नसलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी दाखवायचा प्रयत्न लोगोच्या स्वरूपात केला. माजी विद्यार्थ्यांना या लेखांकडे पाहिल्यावर शाळेची आठवण येईल अशा उद्देशाने बाकीचे design details त्यात मिसळले. Visually ही मालिका सतत उत्सुकता वाढवणारी कशी राहील आणि त्यात नीरसता कशी येणार नाही याचाही प्रयत्न आम्ही करत होतो.

वर्षभर सातत्याने हा उपक्रम हळू-हळू evolve होताना पाहायला मिळाला. विविध पार्श्वभूमीच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या life trajectories वाचताना, खूप मोठा दिलासा आणि प्रोत्साहन मिळत गेलं! या संपूर्ण प्रक्रियेत खूप शिकायला मिळाले. आणि या गटाचा मला एक भाग होता आलं याचं मला खूप समाधान वाटतं.



**पल्लवी गोखले – नगरकर,**
**इ. १०वी – १९८६**
**नंतर दोन/तीन वर्षे युवती विभागाचे काम केले.**
**शिक्षणानंतर आता ज्ञान प्रबोधिनी, संचालक कार्यालयामध्ये मा. संचालकांची साहाय्यिका म्हणून साधारण २० वर्षे काम करीत आहे.**
**9325080757**
**pallavi.nagarkar@jnanaprabodhini.org**

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने पुन्हा एकदा शाळेशी जास्त जोडली गेले. या वर्षभराच्या कार्यक्रमांमध्ये नियोजनाची काही ना काही जबाबदारी घेता आली याचा खूप आनंद होतो आहे. त्यानंतर प्रशालेच्या ५१ व्या वर्षानिमित्त आयोजित केलेल्या ५१@५१ या उपक्रमाबद्दल मानसीताईंकडून कळलं. नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. मा. गिरीशराव आणि मा. सुभाषराव यांची संमती या कामासाठी असेलच असे गृहित धरून कामाला सुरुवात केली. या उपक्रमामधील माझे काम कामाच्या स्वरूपामुळे थोडे उशीराने सुरू झाले. हे काम करताना खूपच छान वाटलं. मी कन्यका प्रशालेच्या सहाव्या तुकडीची विद्यार्थिनी असल्यामुळे ज्या-ज्या विद्यार्थिनींच्या मुलाखती झाल्या त्या सगळ्या मला माहिती होत्या. पण प्रत्येकीची गोष्ट वाचल्यावर प्रत्येकीनी आपापल्या क्षेत्रात किती उत्तम कामगिरी केलेली आहे हे समजलं. आणि आपल्या मैत्रिणींचे यश पाहून खूपच आनंद झाला. प्रबोधिनीमध्ये बरीच वर्षे काम करत असल्यामुळे बरेच माजी विद्यार्थिही नावाने का होईना माहित होते. प्रत्येकाचं कार्यक्षेत्र किती वेगवेगळं आणि विस्तारलेलं आहे हे गोष्टी वाचून कळलं. यातील प्रत्येकजण चाकोरीबाहेर जाऊन किती वेगवेगळ्या प्रकारची कामे करत आहेत हे वाचल्यावर त्यातून खूप प्रेरणा मिळाली. गटानी एकत्र काम करण्याचाही छान अनुभव मिळाला. एकूणच वर्षभराचा हा उपक्रम खूप काही देऊन गेला.



**मानसी बोडस**

**प्रबोधिनिशी पहिल्यांदा संबंध आला तो पालक म्हणून आणि मग संवादिनी गट सुरू झाला त्याच्या माध्यमातून प्रबोधिनी समजून घ्यायला सुरुवात झाली. आधी संवादिनीच्या उपक्रमात सहभागी होते. गेली दहा वर्षे प्रबोधिनीत पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून वृत्त संपादन आणि विस्ताराच्या काही गटांचा समन्वय हे काम करत आहे**

**9890455765**

**manasee.bodasjnanaprabodhini.org**

*** ते सध्या काय करतात ?***

प्रबोधिनीत काम करताना कायम उत्सुकता होती की हे प्रबोधिनीचे आत्तापर्यंत चे विद्यार्थी नक्की काय करतात ? आ. आप्पांची स्वप्ने पूर्ण करत असतील का ? हे आणि असे अनेक प्रश्न !!

मा. अजितरावांनी हा प्रस्ताव दाखवला आणि मी लगेच होकार देऊन टाकला की मला आवडेल हे काम करायला. या पद्धतीच्या संपादनाचा फारसा अनुभव नव्हता पण आवडणार होते असे काम करायला. तस बघितलं तर आमचा गट हा दोन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारा होता. पण गटाचे सूर खूप जुळलेले होते त्यामुळे मालिका रंगत गेली.

पहिल्या गोष्टीपासूनच माझं अनुभवविश्व समृद्ध व्हायला सुरुवात झाली. या ५१ गोष्टींमध्ये एकही गोष्ट दुसऱ्यासारखी नाही, इतकी विविधता आहे. प्रत्येकाशी गोष्ट पूर्ण करण्यासाठी झालेला संवाद खूप हृद्य होता. प्रत्येकाच्या मनात प्रबोधिनिशी जोडलेला धागा खूप पक्का होता हे प्रकर्षाने जाणवले. संघटन, नेतृत्व, देशप्रश्न असे डोकावणारे शब्द आणि त्याला जोडलेले अनुभव हे महत्त्वाचे वाटले.

माझा स्वतःचा अनुभव म्हणजे मी प्रत्येकाशी एका धाग्याने जोडले गेले. काही गमतीशीर अनुभव पण आले. मी या गटाची सदस्य असल्याने काही जण मला मुलांच्या वयाची समजून बोलले आणि मी तो समज राहू दिला.

हे वर्ष एक मंतरलेला काळ होता असं मी म्हणेन.

एक रविवार गेला की पुढच्या रविवारचे वेध लागलेले असायचे. प्रत्येकाच्या उपलब्ध वेळेप्रमाणे अगदी पहाटे पाच पासून ते रात्री उशिरा पर्यंत ताई ऑनलाइन दिसला म्हणजे जाग्या आहात तर आत्ता बोलूया का? असेही बोलणे व्हायचे. प्रबोधिनीत असलेल्या संग्रहातून गोष्टीला पूरक फोटो शोधणे, वेळप्रसंगी प्रसारमाध्यमातून शोधणे यासाठी पल्लवी, श्रेयश आणि इतरही सहभागी व्हायचे.

ही मालिका आमच्या गटाकडून पूर्ण होण्यात सगळ्यात जास्त श्रेय मा. अजितरावांचे आहे. गट प्रेरित ठेवणे आणि कमी तिथे आम्ही असं म्हणत काम पूर्ण करणे. कधी आग्रह धरायचा आणि कधी सोडायचा हे सगळं न जाणवू देता त्यांनी करून घेतलं

प्रत्येक गोष्ट वेगळी त्यामुळे साच्यात बसवण्याचा प्रश्नच नव्हता. खरंतर प्रत्येक गोष्टीमागची एक गोष्ट लिहिता येईल इतके विविध अनुभव साठले आहेत आमच्या सगळ्यांकडे. या सगळ्यामध्ये एक वेगळच झपाटलेपण होतं. मी आणि पल्लवी तर अनेक प्रयोग करून गोष्टी पूर्ण करत होतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कोरोनाची टाळेबंदी आणि अशा अनेक अडथळ्यांना पार करत आम्हाला गोष्टी वेळेत पूर्ण करता आल्या. या सर्व गोष्टी संपादित करताना ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्या माझ्या अपुऱ्या ज्ञानामुळे आहेत त्याबद्दल क्षमस्व !!

या ५१ गोष्टींची कृतांजली आप्पांच्या चरणी अर्पण !!!